# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे-२०१९/१०/९६४८०
दूरध्वनी: २६६७७५५५
फॅक्स : २६६७७६६६
Email : supdt@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : 22 ऑक्टोबर,२०१९.

प्रति,
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
मुख्य कार्यकारी अधिकारी/व्यवस्थापकीय संचालक, विशेष नियोजन प्राधिकरणे/
अग्निशमन विभाग, शासकीय अग्निशमन सेवा, सार्वजनिक उपक्रमे व शासकीय उपक्रमे,
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा,
मुख्य अग्निशमन अधिकारी, सर्व अग्निशमन दले.

विषय : अग्निशमन सेवेत महिला उमेदवारांना अग्निशामक म्हणून सामावून घेणेबाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एफएफएस-१०८६/२५२५/सीआर-३५४/नवि-३०, दि.३०.०३.१९९०.
२. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एफएफएस-१६२००३/७०७/प्र.क्र.७८/२००३/नवि-६, दि.२४.०६.२००४.
३. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/प्र.क्र,२११/नवि-२०, दि.३१.०८.२००९.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे यांचे स्थायी आदेश-३१ क्र.नप्रसं/अग्निशमन सेवा/२००५/प्र.क्र.३१४/९, दिनांक २५ एप्रिल,२००५.
५.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे यांचे परिपत्रक क्र.नपप्रसं-२००५/२/१३ केएच/५/प्रलंबित पदनि/प्र.क्र.४६४-२००५/का-२४(४)/१३०५, दि.१०.०४.२०१९.

***महोदय,***

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, विशेष नियोजन प्राधिकरणे, शासकीय उपक्रमे, यांच्या अग्निशमन सेवेसाठी कर्मचा-यांना तांत्रिक स्वरुपाचे प्रशिक्षण मिळावे व प्रशिक्षित उमेदवार उपलब्ध व्हावेत यासाठी किमान एस.एस.सी.उत्तीर्ण व अन्य शारीरिक पात्रता धारण करणा-या खाजगी उमेदवारांसाठी सहा महिने कालावधीचे निवासी अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम सुरु करण्यासाठी उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार शासनाने राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राची स्थापना केली. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.अशस-१४०७/३६०/प्र.क्र,२११/नवि-२०, दि.३१.०८.२००९ अन्वये राबविण्यात येणा-या **महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान** अंतर्गत राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा विस्तार करुन **महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी** प्रस्थापित करण्यात आलेली आहे.

०२. राज्यातील जनतेला आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक अग्निशमन सेवा देण्याची जबाबदारी प्रामुख्याने महानगरपालिका/नगरपरिषदा/नगर पंचायती तसेच विशेष नियोजन प्राधिकरणे व सार्वजनिक उपक्रमांतील अग्निशमन सेवांची आहे. याबाबत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम,२००६ आणि नियम,२००९ स्थानिक प्राधिकरणे आणि नियोजन प्राधिकरणे यांच्या क्षेत्रांमध्ये लागू झाला आहे. शासन निर्णय, नगर विकास विभाग दिनांक ३१.०८.२००९ अन्वये महानगरपालिका/

नगरपरिषदा/नगर पंचायतींकडे अग्निशमन सेवा प्रस्थापित करण्यासाठी तसेच अग्निशमन सेवांचे सक्षमीकरण करण्यासाठी **महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान** राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानांतर्गत नवीन अग्निशमन केंद्रे बांधणे व अग्निशमन वाहने खरेदी करणे यासाठी शासन अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे. आतापर्यंत सुमारे २२३ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अग्निशमन केंद्रे बांधणे व अग्निशमन वाहन खरेदी करणे यासाठी या अभियानांतर्गत शासनाने अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यामुळे राज्यात नव्याने अग्निशमन केंद्रे प्रस्थापित होत आहेत. ही अग्निशमन यंत्रणा राबविण्याकरीता प्रशिक्षित अग्निशामकांची नियुक्ती करणे ही संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. त्यामुळे राज्यात नव्याने निर्माण होणा-या अग्निशमन केंद्रांसाठी अग्निशामकांची मोठया प्रमाणावर मागणी असल्यामुळे अग्निशमन प्रशिक्षणाची मागणी वाढत आहे. या मनुष्यबळाला अग्निशमन व विमोचनाचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी शासनाने महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीकडे सोपविलेली आहे.

०३. शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.एफएफएस-१६२००३/७०७/ प्र.क्र.७८/२००३/नवि-६, दिनांक २४.०६.२००४ नुसार राज्यातील महानगरपालिका/ नगरपरिषदा/नगर पंचायती, शासकीय उपक्रमे, नियोजन प्राधिकरणे, इत्यादींच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नवीन नियुक्तीसाठी किमान १० वी उत्तीर्ण आणि राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा म्हणजेच महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना सामावून घ्यावयाचे आहे. त्यामुळे प्रशिक्षित उमेदवार उपलब्ध होण्यासाठी अधिक उमेदवारांना अग्निशमन प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. वरील संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये खालील अग्निशमन सेवांना प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा दर्जा देवून त्यांना महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीची प्रादेशिक अग्निशमन प्रशिक्षण केंद्रे म्हणून शासनाने दिनांक ०१.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. ठिकाणी इयत्ता १० वी उत्तीर्ण व शारिरीक अर्हता धारण करणा-या पुरुष व महिला खाजगी उमेदवारांसाठी ०६ महिने कालावधी निवासी अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम आयोजित करण्यांत येत आहेत.

१. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे मुंबई अग्निशमन दल.
२. पुणे महानगरपालिका अग्निशमन सेवा.
३. नागपूर महानगरपालिका अग्निशमन सेवा.
४. ठाणे महानगरपलिका अग्निशमन सेवा.
५. नाशिक महानगरपालिका अग्निशमन सेवा.
६. नवी मुंबई महानगरपालिका अग्निशमन सेवा.
७. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अग्निशमन सेवा.
८. शहर व औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित - सिडको अग्निशमन सेवा.

०४. उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका, नगरपरिषदा, विशेष नियोजन प्राधिकरणे, शासकीय उपक्रमे, इत्यादींच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नविन नियुक्तीसाठी किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण व संबंधित उमेदवारांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा म्हणजेच आताची महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यांत यावे व अन्य कोणत्याही संस्थेच्या उमेदवारांचा विचार करण्यांत येऊ नये असे शासन आदेश आहेत. याबाबात आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी यांनी उपरोक्त संदर्भ क्र.५ अन्वये सुध्दा आदेश दिलेले आहेत.

०५.  आतापर्यंत पुरुष उमेदवारांसाठीच अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम आयोजित करण्यांत येत आहेत. अग्निशमन सेवेमध्ये महिलांना संधी मिळावी याकरीता विविध स्तरावरुन शासनाकडे मागणी होत होती. त्यामुळे अग्निशमन सेवेमध्ये महिलांना संधी मिळावी याकरीता जानेवारी, २०१९ पासून महिला उमेदवारांसाठी या अकादमीने ०६ महिने कालावधीचे अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम (निवासी) आयोजित करण्यांस सुरुवात केली असून २७ महिला उमेदवारांची पहिला बॅच जानेवारी ते जुन, २०१९ या कालावधीत पूर्ण झालेली आहे. यापुढेही महिला उमेदवारांसाठी अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम आयोजित करण्यांत येणार आहेत. महिला उमेदवारांसाठी अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रमासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक व शारिरीक पात्रता विहित करण्यांत आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| किमान शैक्षणिक पात्रता | : | १० वी उत्तीर्ण |
| किमान शारिरिक पात्रता | : | उंची : १५७ सें.मी.<br>वजन : ४६ कि.ग्रॅ. |

०६.  राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगर पंचायती, विशेष नियोजन प्राधिकरणे, शासकीय अग्निशमन सेवा, सार्वजनिक व शासकीय उपक्रमे, इत्यादींच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नवीन नियुक्ती करतांना महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीमधून अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेल्या पुरुष उमेदवारांसोबतच महिला उमेदवारांनासुध्दा शासनाच्या धोरणानुसार राखीव जागा ठेवण्यांत याव्यात व अग्निशामक पदाकरीता सरळसेवा भरतीच्या जाहिरातीमध्ये महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमीचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेल्या महिला उमेदवारांचा समावेश करावा, जेणेकरुन राज्यातील विविध अग्निशमन सेवांमध्ये प्रशिक्षित महिलांनाही अग्निशामक पदांकरीता संधी प्राप्त होतील.

आपला विश्वासू,

१/१०

**(डॉ.प्र.सु.रहांगदळे)**
संचालक
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

प्रत : माहितीसाठी सादर.

१. मा.प्रधान सचिव-२, नगर विकास, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई ४०० ०३०.

राज्य अग्निशमन केंद्रात सब-ऑफिसर्स पाठयक्रम सुरु करणे व अग्निशमन सेवेतील नवीन नियुक्तीसाठी उमेदवारांची शैक्षणिक पात्रता किमान इयत्ता १० उत्तीर्ण व इतर अटी असणेबाबत..

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक :एफएफएस १६२००३/७०७/प्र.क्र.७८/२००३/नवि-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २४ जून, २००४

संदर्भ :-अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक ३५९/अस/मशा/-२००३/ सीआर-७५, दिनांक १४.०८.२००३

---

प्रस्तावना :- राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य अग्निशमन सल्लागार समितीच्या दिनांक ९ मे, २००३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या वरील पत्रानुसार राज्यातील अग्निशमन सेवेचे कार्य प्रामुख्याने महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकिय उपक्रमे, इत्यादी यांचेमार्फत चालविले जाते. अग्निशमन सेवेतील अग्निशामक पदासाठी सद्या किमान इयत्ता ७ वी उत्तीर्ण शैक्षणिक पात्रता आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीने व राज्य अग्निशमन सल्लागार समितीने अग्निशामकाच्या सेवेचा दर्जा वाढविण्यासाठी किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण असल्यास अग्निशामकाच्या सब ऑफिसर्स पाठयक्रम प्रवेशाच्या शिफारशी पाठवितांना अडचणी येणार नाहीत . पयार्याने अग्निशामकांची सब-ऑफिसर्स पाठयक्रम पूर्ण केल्याने त्यांच्या शैक्षणिक पात्रतेत वाढ होवून सेवेचा दर्जा वाढेल व भविष्यातील पद्दोन्नतीपासून ते वंचित राहणार नाहीत. त्यामुळे राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकिय उपक्रमे इत्यादीच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नवीन नियुक्तीसाठी किमान १० वी उत्तीर्ण व राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण करण्याची अट सेवा नियमात अंतर्भूत करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीची शिफारस व राज्य अग्निशमन सल्लागार समितीच्या वरील शिफारशीच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकिय उपक्रमे, इत्यादींच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नवीन नियुक्तीसाठी यापुढे किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १० वी उत्तीर्ण असेल व संबधित उमेदवारांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा,

शासकिय उपक्रमे इत्यादींनी अग्निशामक पदाच्या सेवा नियमात वरील आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(म.दि.आडिवरेकर)
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव

प्रति,
अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, सांताक्रुझ-पूर्व मुंबई
सर्व विभागिय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
संचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०० ०२५
आयुक्त, सर्व महानगरपालिका
मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा
गृह विभाग,
निवडनस्ती (नवि-६) नगर विकास विभाग

# नगरपरिषद प्रशासन संचालनालय

शासकीय परिवहन सेवा इमारत

३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग,

वरळी, मुंबई ४०० ०३०.

आदेश क्र.नपप्रसं २००५/२/१३ केएच/५/प्रलंबित पदनि/प्र.क्र.४६४-२००५/का-२४ (४)/1305

दिनांक : 10 APR 2019

संदर्भ : १) शासन, नगर विकास विभाग निर्णय क्र.एफएफएस १६२००३/७०७/प्र.क्र.७८-२००३/नवि-६ मंत्रालय, मुंबई दि.२४-०६-२००४.

२) महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांचे जा.पत्र.क्र.मअसे-३२ एफ/२०१७/९९, दि.१६-०१-२०१८.

३) कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग, (नवि-१८), मंत्रालय, मुंबई यांचे जा.पत्र.क्र.एमयुएन-२०१८/ प्र.क्र.४७०/ नवि-१८, दि.२१-०८-२०१८ रोजीचे पत्र.

४) या संचालनालयाचे समक्रमांकाचे दि.१०-०४-२०१९ रोजीचे पत्र.

## : परिपत्रक :

नगर विकास विभाग (नवि-१८), मंत्रालय, मुंबई यांनी संदर्भाधीन क्र.१ दि.२४-०६-२००४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये अग्निशमन पाठयक्रमाबाबत पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

" राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदा, शासकीय उपक्रमे, इत्यादींच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नविन नियुक्तीसाठी यापुढे किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १० वी उत्तीर्ण असेल व संबंधित उमेदवारांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. सर्व महानगरपालिका / नगरपरिषदा, शासकीय उपक्रमे इत्यादींनी अग्निशामक पदाच्या सेवा नियमात वरील आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करावेत. "

०२. तसेच संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, सांताक्रूझ यांनी संदर्भाधीन क्र.२ दि.१६-०१-२०१८ रोजीच्या पत्रामध्ये अग्निशमन पाठयक्रमाबाबत पुढीलप्रमाणे अभिप्राय मुख्याधिकारी वडगांव नगरपरिषद यांना याप्रकरणी कळविले आहेत.

" शासनाच्या राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र या संस्थेव्यतिरिक्त अन्य कोणत्याही संस्थेच्या अग्निशामक पाठयक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांचा विचार करण्यात येऊ नये. "

०३. तथापि वडगांव नगरपरिषदेतील वर्ग ४ च्या फायरमन पदाच्या भरतीच्या अनुषंगाने नेमकी कोणती शैक्षणिक अर्हता / अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असणे आवश्यक आहे. याबाबत या संचालनालयाकडून मागितलेल्या अभिप्राया प्रकरणी प्रस्तावाची तपासणी केली असता या संचालनालयाने मंजूर केलेल्या सेवाप्रवेश नियमात वर्ग-४ फायरमन पदाच्या शैक्षणिक अर्हतेमध्ये बदल केलेले नाहीत असे निदर्शनास आले आहे. या संचालनालयाने मंजूर केलेल्या सेवाप्रवेश नियमात वर्ग-४ फायरमन पदासाठी सरळसेवेने खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता नमूद केली आहे.

" किमान माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण व शासनमान्य संस्थेकडून फायरमनचे प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक."

सबब या परिपत्रकान्वये वर्ग-४ फायरमन पदासाठी असणाऱ्या सेवाप्रवेश नियमात उपरोक्तप्रमाणे नमूद शैक्षणिक अर्हतेऐवजी यापुढे किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १० वी उत्तीर्ण असेल व संबंधित उमेदवारांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक पाठयक्रम पूर्ण केलेला असावा अशी सुधारणा करण्यात येत आहे. उर्वरीत अर्हतेमध्ये कोणताही बदल नाही.

०४. तरी यापुढे राज्यातील सर्व नगरपरिषदेने वर्ग-४ च्या फायरमन पदाची भरती करताना शासनाच्या राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक पाठयक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांचा विचार करावा व या परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त तथा संचालक (नपप्रसं) यांचे मान्यतेने.**

आपला विश्वासू,

10/11/2019

(दगा मोरे)

उप संचालक

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई

प्रत :
१) सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन विभाग.
२) सर्व जिल्हा प्रशासन अधिकारी.
३) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत.